# पनवेल महानगरपालिका

## पर्यावरण विभाग

### ध्वनी प्रदूषण व फटाके नियंत्रणाबाबत नागरिकांना आवाहन

मा. मुंबई उच्च न्यायालयाने Suo Motu PIL No. ०१ of २०२६ प्रकरणामध्ये दिलेल्या अंतरिम आदेशाच्या अनुषंगाने पनवेल महानगरपालिकेमार्फत नागरिकांना खालील बाबींचे काटेकोरपणे पालन करण्याचे जाहीर आवाहन करण्यात येत आहे.

**१. सार्वजनिक ठिकाणी फटाके फोडण्यास प्रतिबंध**

सार्वजनिक रस्ते, रस्त्याच्या कडेला असलेली ठिकाणे, गल्ली, फुटपाथ व इतर सार्वजनिक ठिकाणी सण / उत्सवाच्या काळात फटाके फोडू नयेत.

**२. शांतता क्षेत्रांमध्ये फटाके फोडण्यास विशेष प्रतिबंध**

मा. न्यायालये, रुग्णालये, शासकीय कार्यालये, शाळा व इतर शांतता क्षेत्रांच्या परिसरात फटाके फोडू नयेत.

**३. ध्वनिवर्धक यंत्रणेबाबत आवश्यक परवानगी व अटींचे पालन करणे.**

सार्वजनिक कार्यक्रम, मिरवणुका किंवा इतर कार्यक्रमांमध्ये ध्वनिवर्धक यंत्रणेचा वापर करण्याकरिता सक्षम प्राधिकरणाची परवानगी घेणे व परवानगीच्या सर्व अटींचे पालन करणे आवश्यक राहील.

**४. ध्वनी व वायू प्रदूषण टाळा**

फटाके व ध्वनिवर्धक यंत्रणेमुळे ध्वनी प्रदूषण तसेच फटाक्यांमुळे वायू प्रदूषण होऊन नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यामुळे नागरिकांनी पर्यावरणपूरक पद्धतीने सण / उत्सव साजरे करावेत.

**५. फटाक्यांच्या वापराबाबत आवाहन**

तुलनेने कमी ध्वनी व कमी उत्सर्जन करणाऱ्या Green Crackers (हरित फटाके) चा वापर करण्यास प्राधान्य द्यावे. Green Crackers (हरित फटाके) म्हणजे तुलनेने कमी प्रदूषणकारी फटाके असून त्यांच्या निर्मितीमध्ये पारंपरिक फटाक्यांच्या तुलनेत प्रदूषक घटकांचे प्रमाण कमी ठेवले जाते.

Green Crackers (हरित फटाके) हे पूर्णपणे प्रदूषणमुक्त नसतात, त्यामुळे त्यांचा वापर करतानाही लागू असलेल्या नियमांचे व वेळेच्या मर्यादांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

**तक्रार संपर्क क्रमांक :- ८९६०९१६०९१** **ई-मेल :- panvelcorporation@gmail.com**

मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करून शांत, सुरक्षित व प्रदूषणमुक्त सण/उत्सव साजरे करण्याच्या अनुषंगाने सर्व नागरिकांनी पनवेल महानगरपालिकेस सहकार्य करावे.

जा.क्र:. पमपा/पर्यावरण/३४२६/१५१/२०२६.

दिनांक : २३ ऑक्टोबर २०२६

**(स्वाक्षरीत/-)**
**उपायुक्त (पर्यावरण)**
**पनवेल महानगरपालिका**